# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक 28/07/2023 (शुक्रवार) सकाळ**

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०७ कि. मी अंतरावरील मौजा रिंगणाबोडी शिवार तुरकेल फार्महाउस येथे दिनांक २५/०७/२०२३ चे १९.३० वा. दरम्यान यातील **आरोपी क्र. १) हर्श अनंदीलाल वर्मा, वय २२ वर्ष, रा. प्लॉट नं ३९ खडगाव रोड सोनबानगर वाडी पाणी टाकी जवळ नागपुर २) दानेश दुर्गाप्रसाद शिवपेठ, वय २१ वर्ष, रा. गोधनी रोड रूद्राक्ष सोसायटी जुना मानकापुर नागपुर ३) लक्की संजय तुरकेल, वय २२ वर्ष रा. मरीयम नगर सिताबर्डी तार आफिस समोर पोलीस ठाणे सिताबर्डी नागपुर ४) ओंकार महेन्द्र तलमले, वय २५ वर्ष, रा प्लॉट नं ५४ स्मृती ले आउट नागपुर ५) हर्श सौदागर बागडे, वय १९ वर्ष रा. सुरक्षा नगर प्लाट नं ३७ दत्तवाडी तो ठाणे वाडी नागपुर ६) विशाल पवनकुमार पुंज, वय ४१ वर्ष, रा. प्लाट नं १५/०४ मोहन नगर बडकस चौक पोलीस ठाणे कोतवाली नागपुर** यांनी संगणमत करून व पुर्वनियोजित कट रचुन मिसिंग मधील इसम नामे –१. निरालाकुमार जयप्रकाश सिंग, वय ४३ वर्ष, रा प्लाट नं ४२ प्रसाद अपार्टमेंट एच बी टाउन पारडी चौक पोलीस ठाणे पारडी नागपुर २. अमरिश देवदत्त गोळे वय ४१ वर्ष रा प्लाट नं ५९ पलॅट क्र १०२ नरकेसरी ले आउट जयप्रकाश नगर नागपुर यांचे कडुन १ कोटी ५० लाख रूपयाचे डी डी घेवुन त्या मोबादल्यात त्यांना २ कोटी ८० लाख रूपये नगदी देतो असे सांगुन लकी तुरकेल यांचे रिंगणाबोडी शिवारातील फार्महाउस येथे घेवून जावुन अग्नी शस्त्रातुन गोळया झाडुन ठार मारून पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने पेट्रोल टाकुन जाळुन दोन्ही प्रेत अर्धवट जळाल्याने तिरपाल मध्ये गुंडाळुन गाडीने घेवुन जावुन तळेगाव जवळील वर्धा नदीचे पात्रात टाकुन दिले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– राजु रामराव राउत, सहायक पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे सिताबर्डी नागपुर शहर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०२, २०१, १२० (ब) भादंवी सहकलम ३, २५ भाहका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास श्री. बापु रोहम उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा तरोडा येथे दिनांक २६/०७/२०२३ चे २१/३० वा. ते दिनांक २७/०७/२०२३ चे ०६/३० वा. सुमारास फिर्यादी नामे– रवि विनोद सोंलकी, वय २० वर्ष रा. तरोडा हे घरी जेवन करून झोपले व त्यांनी त्यांचा मोबाईल चार्जिंगला लावला त्यानंतर त्यांनी सकाळी उठुन पाहीले असता ॲडराईड मोबाईल हॅन्डसेट दिसला नाही आजुबाजुला शोध घेतला असता फिर्यादी यांचे आजोबांनी सांगितले की रात्री आरोपी नामे– विकास भुराणी, रा. तरोडा हा घरी आला होता तेव्हा फिर्यादी यांनी आरोपीचा शोध घेतला असता फिर्यादीच्या घराशेजारी राहणारा चुलत भाऊ नामे– रोशन सोलंकी हा भेटला व मी आपले घरी झोपलो असता माझा सुध्दा ॲडरॉइड कंपनीचा मोबाईल चोरून नेला आहे असे सांगितले. फिर्यादी यांचा घराचा टिनाचा दरवाजा तोडुन आत प्रवेश करून ॲडरॉइड मोबाईल किंमती ९,९००/– रू. रात्री दरम्यान चोरून नेला आहे व फिर्यादीचा चुलत भाऊ रोशन सोलंकी यांचा मोबाईल किंमती १२,०००/– असा एकुण २१,९९९/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भोजराज तांदुळकर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**